संक्षीप्त फौजदारी खटला क्र.६११/२०२४

निशाणी क्र.४.

**पडताळणी जबाब**

**मी शपथेवर कथन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | – | सुभाष जगन दाभाडे. |
| **वय** | – | ३४ वर्षे, व्यवसाय – मजुरी, |
| **राहणार** | – | बनकिन्होळा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद. |

घटना ही दि.२१.०५.२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता माझ्या राहत्या घरी घडली आहे. त्यादिवशी माझा मुलगा बक–या चारण्याठी गेला होता. त्याठिकाणी आरोपींचा माझ्या मुलासोबत वाद झाला होता. त्यावेळेस मी त्यांना समजविण्यासाठी गेलो असता, आरोपी नामे सुभाष नवतुरे, दिपक सुभाष नवतुरे, नंदु सोनवणे, रितेश या सर्वांनी मला मारहाण केली व मला जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. त्यानंतर आमचे भांडण अनुसयाबाई जगण कांबळे व कलाबाई सुभाश कांबळे यांनी आमचे भांडण सोडविले. त्यानंतर मी वडोदबाजार पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेलो असता, पोलीसांनी मला न्यायालयात जाण्याची समज दिली. याव्यतिरीक्त मला काही सांगायचे नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

BIRADAR AMOL BALAJI

Digitally signed by BIRADAR AMOL BALAJI
Date: 2024.06.26 16:19:50 +0530

दिनांक – २६.०६.२०२४

(ए. बी. बिरादार)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र.०४), सिल्लोड.